लोकमत

मुख्यमंत्र्यांनी उपटले महापालिका प्रशासनाचे कान : 'लोकमत'च्या वृत्तमालिकेचे यश

# भाडेवाढीच्या नाटकावर पडदा

लोकमत इम्पॅक्ट

डॉ. विश्वास मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : शंभराव्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनानिमित्त 'लोकमत'ने उद्योगनगरीतील नाट्यगृहाच्या भाडेवाडीचा मुद्दा वृत्तमालिकेच्या माध्यमातून लावून धरला. 'मुख्यमंत्री साहेब, नाटक करायचं कसं?' असा प्रश्न उपस्थित केला. नाट्यसंमेलनाच्या व्यासपीठावर शनिवारी अभिनेते प्रशांत दामले यांनी नाट्यगृहांच्या भाडेवाढीबद्दल नाराजी व्यक्त केली. आमदार उमा खापरे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी ऑन दि स्पॉट व्यासपीठावरच महापालिका प्रशासनाचे कान उपटले. 'नाट्यगृहांची दरवाढ मागे घ्यावी. पूर्वीप्रमाणे भाडे ठेवावे,' असे आदेश दिले.

परिसरात प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड; आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी; अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी; ग. दि. माडगूळकर नाट्यगृह प्राधिकरण, नटसम्राट निळू फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव ही ५ नाट्यगृहे आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे. त्यांनी चारपट भाडेवाढ केली असून, संगीत रंगभूमीची ५० टक्के भाडे सवलतीची योजना बंद केली. सामाजिक संस्थांच्या कार्यक्रमास व्यावसायिक दराने भाडेवाढ, वाढीव वीज बिल, रंगमंचावरील साहित्य दरवाढ केली. याविषयी आवाज उठवल्यानंतर प्रशासनाने ५० टक्के दरवाढ मागे घेतली होती. मात्र, शंभर टक्के दरवाढ मागे घ्यावी, अशी मागणी होती.



मुख्यमंत्र्यांनी प्रशांत दामले यांच्याकडून विषय समजून घेतला.



आयुक्त शेखर सिंह यांना भाडेवाढ रद्दचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

## ...आणि मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

- दरवाढीबाबत कोणताही निर्णय घेतला जात नसल्याने पिंपरी-चिंचवड शहरात नाटक सादर करणार नाही, अशी भूमिका नाट्यनिर्मात्यांनी घेऊन बहिष्कार टाकला होता.
- **याबाबतही 'लोकमत'ने आवाज उठवला होता. तसेच मुख्यमंत्री पिंपरी-चिंचवडच्या दौऱ्यावर येणार असल्याने 'लोकमत'ने 'मुख्यमंत्री साहेब, नाटक सादर करायचं कसं?' असा प्रश्न उपस्थित केला होता. त्याची दखल मुख्यमंत्र्यांनी घेतली.**
- दरम्यान, मुख्यमंत्री नाट्यसंमेलनाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमास आले असताना आमदार उमा खापरे यांनीही मुख्यमंत्र्यांना पत्र दिले. तसेच अध्यक्ष प्रशांत दामले यांनी भाषणातच नाट्यगृहांच्या भाडेवाढीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.
- **आशिया खंडातील सर्वात मोठी दरवाढ असल्याचे मुख्यमंत्र्यांना सांगितले. तर त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी थेट आपल्या भाषणामध्ये नाट्यगृह दरवाढीबाबत नाराजी व्यक्त केली.**
- ही दरवाढ रद्द करावी, पूर्ववत भाडेआकारणी करावी, असे आदेश त्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिले.

## याकडेही वेधले होते लक्ष!

कोणताही अभ्यास न करता तसेच नाट्यकलाक्षेत्रातील मान्यवरांचे मत विचारात न घेताच महापालिका प्रशासनाच्या वतीने भाडेवाढ करण्यात आली होती. यास खासदार श्रीरंग बारणे, नाट्यपरिषद अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, दिशा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष नाना शिवले, कलारंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित गोरखे, नादब्रह्म परिवाराचे डॉ. रवींद्र घांगुर्डे, वंदना घांगुर्डे, पिंपरी-चिंचवड सोशल फाउंडेशन, कलाश्री संस्था, यशवंतराव चव्हाण संस्था, अथर्व थिअटर अशा विविध संस्थांनी दरवाढ रद्द करावी, अशी मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही प्रशासन भाडेवाढ मागे न घेण्यावर ठाम होते.



हे कसले नाटक! प्रयोगासाठी आता चारपट शुल्क

मुख्यमंत्री साहेब, सांगा बरं, आम्ही नाटक कसं करायचं?

पिंपरी-चिंचवडला नाट्यगृहांची चारपट भाडेवाढ; प्रशासक राजवटीवर नाराजी

## ...अन् अवघ्या दोन तासांतच महापालिकेने काढला आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : नाट्यगृहांच्या भाडेवाडीचा मुद्दा नाट्य संमेलनात उपस्थित झाला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ दखल घेऊन निर्णय रद्द करण्याचे आदेश शनिवारी दुपारीच दिले. त्यावर तातडीने अंमलबजावणी करत भाडेवाढ रद्द करत असल्याचे आदेश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी अवघ्या दोन तासातच काढले आहे.

मराठी तसेच इतर कोणत्याही भाषेतील नाटक अथवा मराठी संगीत नाटक, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध कार्यक्रम, नाट्य संस्था (व्यावसायिक व हौशी नाटक संस्था), प्री स्कुल, शाळा, महाविद्यालय, इतर संस्थाकडून विविध कार्यक्रम घेतले जातात. पालिकेच्या ५ नाट्यगृहाचे व्यावसायिक, हौशी नाटक संस्थाकडून आकारावयाच्या भाडे आकारणी बाबत महापालिकेने दि. १० जानेवारी ते ३० जून २०२३ चा आदेश, दि. ३१ जुलैचा आदेश, दि. ६ जानेवारी २०२४ पासून रद्द केला आहे. व्यावसायिक व हौशी नाट्य संस्था, शाळा, महाविद्यालय, इतर संस्थाकडून आता जुन्या दराप्रमाणे भाडे आकारणी केली जाणार आहे.

> व्यावसायिक व हौशी नाटक, प्री स्कुल, शाळा, महाविद्यालय, इतर संस्थाकडून वेगवेगळ्या स्वरुपाच्या कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व नाट्यगृहातील भाडे आकारणी कमी केली आहे. पूर्वीप्रमाणेच आता भाडे आकारले जाईल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त**